जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2017
पुढारी

# 'विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे'

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** समाजातील विविध प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी आणि विकासासाठी संशोधनाची गरज आहे. पदवीस्तरावरचे शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय संचालक प्रा. डॉ. वासंती रासम यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संशोधनपर कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी प्रा. डॉ. गजानन राशिनकर, प्रा. डॉ. मकरंद ऐतवडे, प्रा. गजानन पाटील, प्रा. डॉ. पांडुरंग पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य एकनाथ काटकर, प्रा. डॉ. राजेखान शानेदिवाण, प्रा. डॉ. सुरेश शिखरे, प्राचार्या डॉ. मंगला पाटील उपस्थित होते. प्रा. डॉ. राहुल मांडणीकर यांनी आभार मानले.

10 DEC 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज, 'विवेकानंद'ची विजयी सलामी

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धा : यादव कॉलेज विजयी

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, विजयादेवी यादव कॉलेज पेठवडगाव आणि विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी आपआपल्या प्रतिस्पर्ध्यांना नमवत 'शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेत विजयी सलामी दिली.

संजीवन इंजिनिअरिंग कॉलेज आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी मनपाच्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर झाले. आमदार अमल महाडिक यांच्या हस्ते आणि नगरसेवक संतोष गायकवाड, किरण नकाते, भाजपचे गटनेते विजय सूर्यवंशी, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष विजय साळोखे-सरदार यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. संयोजन रणजित इंगवले, पंच शिवाजी डुबल, गणेश पोवार, योगेश देशपांडे, संतोष चौगुले आदींनी केले.

दिवसभर रंगलेल्या विविध लढतींचे निकाल असे : कंसात गोल नोंदविणारे खेळाडू : केबीपी इस्लामपूर विजयी विरुद्ध एलबीएस कॉलेज सातारा (२-० अनिष मुडे व आशिष पाटील), शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज वि. वि. शहाजी कॉलेज कोल्हापूर (२-१ वैभव थोरात, सचिन कदम, अनिष जाधव), वाय. सी. कॉलेज इस्लामपूर वि. वि. मुधोजी कॉलेज फलटण (१-० स्वप्निल कांबळे), विजयादेवी यादव पेठवडगाव वि. वि. जयवंत कॉलेज इचलकरंजी (५-० सौरभ सुतार, रोहन पवार प्रत्येकी दोन तर शैलेश पाटील एक), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर वि. वि. केबीपी कॉलेज इस्लामपूर (५-० संकेत तोरलेकर, रणधीर कदम, विनायक माने, लतिफ ढालाईत, आकाश चौगुले), शिवराज महाविद्यालय वि. वि. संजीवन कॉलेज पन्हाळा (१-० प्रज्वल काळे).



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेचे उद्घाटन आमदार अमल महाडिक यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेवक संतोष गायकवाड, किरण नकाते, भाजपचे गटनेते विजय सूर्यवंशी, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, अनिल परांडेकर, मोहन भुर्के आदी उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2017
पुण्यनगरी

# नॅक मूल्यांकनावर परिषद

**कोल्हापूर :** महावीर महाविद्यालयात नॅकच्या मूल्यांकन पद्धतीनुसार महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत दि. १३ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्‌घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षपदी संस्थेचे चेअरमन अ‍ॅड. के. ए. कापसे, कार्यवाहक एम. बी. देसाई उपस्थित राहणार आहेत. या परिषदेच्या विविध सत्रांमध्ये नॅकपिअर टीम मेंबर डॉ. शिरीष चिंधडे, डॉ. शिरगुणकर, डॉ. एच. व्ही. देशपांडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. समारोप डॉ. व्ही. व्ही. ज़ुगळे यांच्या हस्ते होणार आहे.